<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्र.३६/२०२६</u>

<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ प्रमाणे</u>

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.१**

**नाव – संदिप लक्ष्मण बिरादार**

**वय –** ४० वर्षे, **व्यवसाय –** शेती,

**राहणार –** शेकापूरवाडी, ता. उदगीर, जि. लातूर.

**<u>शपथेवर जबाब अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी</u>**

आरोपी हा माझा सावत्र भाऊ आहे. दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजताच्या दरम्यान माझी पत्नी उषा संदिप बिरादार ही आमच्या शेताकडे गेली होती. त्यावेळी आरोपी झाड तोडत असल्याचे माझ्या पत्नीस दिसले. आरोपीने माझ्या पत्नीस शिवीगाळ करून गुंडामार्फत जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात गेलो व आरोपीविरूद्ध तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करून घेतला. आरोपीनी केलेल्या कृत्यासाठी आरोपीस शिक्षा व्हावी, अशी माझी विनंती आहे.

साक्षीदाराची सही

समक्ष

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2026.03.10 18:55:10 +0530

**(के. ए. यादव)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर
(न्यायालय क्र.२)

दि.१०/०३/२०२६